# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

## ।। सामान्य प्रशासन विभाग ।।

जा.क्र.मनपा/सा.प्र./ ८८/२०२१ - २२ दि. 24 / 05 /२०२१

प्रति,

जनमाहिती अधिकारी / सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा
1.उप-अभियंता, सार्व.बांधकाम विभाग,
2.उप-अभियंता, पाणी पुरवठा विभाग,
3.सहा. लेखापरिक्षण, लेखा परिक्षण विभाग
4.लिपीक, लेखा विभाग,
5.लिपीक, भांडार विभाग,
6.लिपीक, वैदयकीय आरोग्य विभाग,
7.लिपीक, संगणक विभाग,
8.लिपीक, परिवहन उपक्रम विभाग,
9.लिपीक, उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग,

विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहीती मिळण्याबाबत.
संदर्भ :- 1. श्री. रमारमण व्यंकटेश कोंतम यांच्याकडील दि.05/04/2021 रोजीचा अर्ज
2.नगर विकास विभाग यांच्याकडील क्रमांक : कैमाअ-2021/प्र.क्र.110/नवि-33, दि.19 मे, 2021 रोजीचे पत्र

विषयंकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रातील विषय हा आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 6 (3) अन्वये संदर्भिय पत्र पुढील कार्यवाहीसाठी आपल्या विभागास वर्ग करण्यात येत आहे. यासंदर्भात दि. 24 मे, 2021 रोजी ई-मेल केलेला आहे. तरी संबंधितांस परस्पर माहीती देण्यात यावी, व त्यांची एक प्रत सामान्य प्रशासन विभागांकडे देण्यात यावी.

सोबत :- संदर्भिय पत्र जोडले आहे.

(अविनाश जाधव)
जनमाहिती अधिकारी तथा
सहा. आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
श्री. रमारमण व्यंकटेश कोंतम
ब्लॉक नं.बी-1/11/1/54 ब भवानी पेठ,
होमकार नगर सोलापूर-413002

E-4697086

नगर विकास विभाग

15 APR

जोडपत्र अ

(नियम-३-पहा)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळविण्यासाठीचा अर्ज**

| | |
|---|---|
| मा.राज्य जन माहिती अधिकारी :- (कार्यालयाचे नाव व पत्ता) | जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२ |
| अर्जदाराचे संपुर्ण नांव :- | रमारमण व्यंकटेश कोंतम |
| पत्ता :- | ब्लॉक नं.बी-१/११/१/५४ ब भवानी पेठ, होमकर नगर सोलापूर-४१३००२ |
| आवश्यक असलेली माहितीचा तपशील :- | दैनिक महाराष्ट्र टाईम्स दि.०३/०४/२०२१ पुणे आवृत्ती मध्ये छापून आलेली बातमी " छोटया कंत्राटदारांचे अडकले आठ हजार कोटी" या मथळयामध्ये छापून आलेली बातमी. |
| (दोन) माहितीशी संबंधीत कालावधी :- | दि.०३/०४/२०२१ ते आजतागायत |

आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन:- दैनिक महाराष्ट्र टाईम्स दि.०३/०४/२०२१ पुणे आवृत्ती मधील छापून आलेल्या बातमीचे झेरॉक्स कात्रण सोबत जोडले आहे. कृपया त्याचे अवलोकन करुन माहिती दयावी. पाठपुरावा करुनही राज्य सरकारकडे किरकोळ कंत्राटदारांची तब्बल आठ हजार कोटी रुपयांची देयके थकली आहेत. यामुळे अडीच लाख कंत्राटदार हवालदिल झाले असून ते आता आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. पंधरा दिवसात बिले न दिल्यास राज्यातील सर्व कामे बंद पाडण्याचा इशारा देण्यात आला आहे. नवीन रस्ते, रस्ते दुरुस्ती, सरकारी इमारती, तलाव यासह अनेक कामे हे किरकोळ कंत्राटदार करतात. गेल्या चार-पाच वर्षात या कंत्राटदारांना टाळून बहुतांश कामे बडया कंत्राटदारांना देण्यात येत आहेत, त्यामुळे आधीच अडचणीत आलेले हे कंत्राटदार बिले थकल्याने जेरीस आले आहेत. जलसंधारण, ग्रामविकास, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी विभागाकडे मोठया प्रमाणावर बिले थकली आहेत. सध्या सरकारकडे तब्बल आठ हजार कोटी रुपयांची बिले थकीत आहेत. पाठपुरावा केल्यानंतर एकूण बिलाच्या केवळ पाच ते दहा टक्के रक्कम दिली जाते, ही रक्कम अतिशय तुटपुंजी असल्याने कंत्राटदारांच्या अडचणी वाढल्या आहेत. महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटनेने शुक्रवारी सरकारबरोबर चर्चा केली पण पदारात काहीच न पडल्याने आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. याचाच एक भाग म्हणून तीन मे रोजी भीक मांगो आंदोलन करण्यात येणार आहे. श्री मिलिंद भोसले, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना यांनी याबाबत थकित देयके तातडीने दयावीत अन्यथा राज्यभर आंदोलन केले जाईल असे नमुद केले आहे. त्यानुसार नगर विकास विभागाकडे थकलेली बिले अठावीशे कोटी रुपयांची आहेत,याबाबत वस्तुनिष्ठ माहिती दयावी.

| | |
|---|---|
| माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीश किंवा कसे. :- | टपालाने |
| टपालाद्वारे असेल त्याबाबतीत सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र. :- | नोंदणीकृत |
| अर्जदार दारीद्रयरेषेखालील आहे काय :- | लागू नाही |

स्थळ : सोलापूर

दिनांक : ०५/०४/२०२१

अर्जदार

(रमारमण व्यंकटेश कोंतम)

माहितीचा
अधिकार

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग

सामान्य प्रशासन विभाग
आवक क्र. ९५
दि. २४/५/२०२१

४ था मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

Email ID : gajanan.alewa_@nic.in

क्रमांक :- केंनाअ-२०२१/प्र.क्र.११०/नवि-३३ दिनांक :- १९ मे, २०२१

प्रति,

श्री. रमारमण व्यंकटेश कोंतम,
ब्लॉक नं-बी-१/११/१/५४ ब
भवानी पेठ, होमकर नगर,
सोलापूर-४१३ ००२.

**विषय :- माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती देण्याबाबत.**
**संदर्भ :- दिनांक ०५.०४.२०२१ रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

महोदय,

वरील विषयाबाबतचा आपला संदर्भाधिन दिनांक ०५.०४.२०२१ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत केलेला अर्ज कार्यासन नवि- ८ कडे प्राप्त झालेला असून सदर अर्ज कार्यासन नवि- ८ कडून या कार्यासनास प्रत्यक्षात दिनांक २२.०४.२०२१ रोजी प्राप्त झाला आहे.

२. आपण संदर्भाधीन माहिती अधिकार अर्जान्वये दैनिक महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात दिनांक ०३.०४.२०२१ रोजी छापलेल्या कंत्राटदारांच्या थकीत देयकाबाबत वस्तुनिष्ठ माहिती मागितली आहे.

३. सदर माहिती अधिकार अर्जामध्ये नमूद विषय सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतींशी संबंधित असल्याकारणाने आपला माहिती अधिकारातील अर्ज जन माहिती अधिकारी तथा आयुक्त/ मुख्याधिकारी, सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत यांच्याकडे उचित तथा आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

४. याबाबतचा पुढील पाठपुरावा संबंधित जन माहिती अधिकारी तथा आयुक्त/मुख्याधिकारी, सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत यांच्या कार्यालयाकडे करण्यात यावा,ही विनंती.

आपला,
(स्वाक्षरी) १९.५.२१
(ग. द. आलेवाड)
जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

प्रति,

**जन माहिती अधिकारी, आयुक्त/ मुख्याधिकारी, सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत.**

आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त नमूद माहिती अधिकार अर्जामध्ये मागणी केलेली माहिती आपल्या कार्यालयाशी संबंधित असल्याने, सदर अर्ज पुढील कार्यवाहीसाठी कलम ६ (३) अन्वये आपणाकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे. या अर्जावर उचित कार्यवाही करून अर्जदारास परस्पर माहिती कळविण्यात यावी, ही विनंती.

आपला,
(स्वाक्षरी) १९.५.२१
(ग. द. आलेवाड)
जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी